**Self-Declaration / स्वघोषणापत्र**

I/We hereby solemnly affirm and state that the business which I/we have started is not banned or prohibited by any Act, Rules, Law or Order of any Court of Law or any competent authority and the premises where I/we are conducting the said business is free from violation of any Act, Rules, Order of any Court of Law or any Competent Authority.

I/We hereby declare that the information provided above is true and correct to the best of my/our personal knowledge, information and belief. I/We am/are fully aware about the consequences of giving false information. If the information is found to be false, I/We shall be liable for procecution and punishment under the Indian Penal Code (45 of 1860) and /or any other law applicable thereto.

I/We have obtained necessary licenses, permissions, permit for the conduct of this business and the place of business from the appropriate Authority.

I/We shall be responsible and liable for legal action if the business is conducted without proper licence, permission, permit from the appropriate Authority.

I/We submit and declare that I/We will not undertake any illegal activity or any business prohibited in law in force in India.

I/We declare that the place of business is not located in any area wherein commencing / running of such business is prohibited by any law or order of any Competent Authority.

I/We hereby declare that the copies attested by me are true copies of original documents. I/We am/are well aware of the fact that if the copies are found false/forged, I/We shall be liable for procecution and punishment under the Indian Penal Code (45 of 1860) and /or any other law applicable thereto.

I/We undertake to abide by the provisions of the Maharashtra Shops and Establishments (Regulation of Employment and Conditions of Service) Act, 2017 (Mah. LXI of 2017) and the Rules and orders passed thereunder by any Authority.

मी/आम्ही, याद्वारे गांभीर्यपूर्वक दृढकथन करतो/ करते आणि असे नमूद करतो/ करते की, मी/ आम्ही सुरू केलेल्या व्यवसायावर कोणताही अधिनियम, नियम, कायदा किंवा कोणत्याही विधि न्यायालयाचा अथवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश याद्वारे बंदी घालण्यात आलेली नाही किंवा मनाई करण्यात आलेली नाही आणि मी/ आम्ही ज्या जागेत उक्त व्यवसाय करीत आहे/ आहोत तेथे कोणताही अधिनियम, नियम, कोणत्याही न्यायालयाचा अथवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याचा आदेश यांचे उल्लंघन झालेले नाही.

मी/आम्ही, याद्वारे असे घोषित करतो/करते की, वर अर्जामध्ये नमूद केलेली माहिती, माझ्या आमच्या वैयक्तिक ज्ञानानुसार, माहितीप्रमाणे व विश्वासानुसार खरी व बिनचूक आहे. चुकीची माहिती देण्याच्या परिणामाची मला/आम्हाला

पूर्ण जाणीव आहे. दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास मी/आम्ही भारतीय दंड संहिता (1860चा 45) अन्वये किंवा त्यासंबंधात लागू असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये खटला भरण्यासाठी व शिक्षेसाठी पात्र आहे/ आहोत.

मी/आम्ही, अर्जात नमूद केलेल्या जागेत व्यवसाय करण्यासाठी संबंधित समुचित प्राधिकाऱ्याकडून आवश्यक ती अनुज्ञप्ती, परवानगी, परवाना प्राप्त केला आहे.

मी/आम्ही, अनुज्ञप्ती, परवानगी, परवाना न घेता व्यवसाय करीत असल्यास कायदेशीर कारवाईसाठी पात्र व जबाबदार राहू.

मी/आम्ही, असे घोषित करतो/करते की, भारतातील लागू असणाऱ्या कायद्यांतर्गत मनाई असलेले बेकायदेशीर कृत्य अथवा व्यवसाय करणार नाही.

मी/आम्ही, असे घोषित करतो/करते की, जेथे असा व्यवसाय सुरू करण्यास किंवा चालविण्यास कोणत्याही कायद्याव्दारे किंवा कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या आदेशाद्वारे मनाई केलेली आहे त्या कोणत्याही क्षेत्रामध्ये माझे/ आमचे व्यवसायाचे ठिकाण स्थित नाही.

मी/आम्ही, असे घोषित करतो/करते की, अर्जासोबत सादर केलेल्या स्वयं-साक्षांकित दस्तऐवजाच्या प्रती या मूळ दस्तऐवजाच्या सत्यप्रती आहेत. या प्रती असत्य किंवा बनावट असल्याचे आढळून आल्यास भारतीय दंड संहिता (1860 चा 45) आणि / किंवा त्यासंबंधात लागू असलेल्या कोणत्याही इतर कायाद्यान्वये माझ्या/आमच्या विरुध्द न्यायालयीन खटला भरण्यासाठी व शिक्षेसाठी मी / आम्ही पात्र आहे/ आहोत याची मला/आम्हाला पूर्ण जाणीव आहे.

मी/आम्ही, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, 2017 (2017 चा 61) व त्याअंतर्गत तयार केलेल्या नियमातील तरतुदींचे आणि सक्षम प्राधिकारी यांचेकडून निर्गमित करण्यात आलेले आदेश यांचे पूर्णत: पालन करण्याची हमी देतो/देते.

**Name and Signature of the Employer**